# स्त्रीभ्रूण हत्या व महिलांसंबधी महत्त्वाचे काही...



भारतासारख्या विकसनशील देशामध्ये सध्या स्त्रीभ्रूणहत्या व मुलींच्या जन्माची घटती संख्या ही मोठी समस्या निर्माण झालेली आहे. मुलगाच हवा हा अट्टाहास, मुलीला दुय्यम वागणूक, महिलांमध्ये असणारी आर्थिक, सामाजिक व शारीरिक असुरक्षितता, हुंडा पद्धती मुलगी अविवाहित राहिल्यास कुटुंबाला कलंक आहे अशी भावना, गर्भलिंग निदानाची सहज व परवडण्याजोगी उपलब्धता, वैद्यकीय क्षेत्रातील ढासळलेली नैतिकता, काही राज्यांमध्ये असणारे दोन अपत्यांचे धोरण, महिलांचे बाजारीकरण (वस्तू म्हणून) या कारणांवरून स्त्रीभ्रूणहत्यांमध्ये वाढ झालेली दिसत आहे. या करिता शासनाकडून कायदा व योजना लागू करण्यात आलेल्या आहेत.

## कायदा –योजना

- कायद्याने लिंग निवडीस बंदी
- महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण
- तंटामुक्त गाव पुरस्कारअंतर्गत कन्या जन्मानंद भेट योजना
- शुभमंगल सामूहिक विवाह योजना
- आठवा फेरा स्त्रीजन्माच्या स्वागताचा

## चिंता नको खर्चाची,
## मोफत सेवा बाळंतपणाची
## जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमाअंतर्गत



### गरोदर स्त्रीसाठी सेवा

- सरकारी दवाखान्यात बाळंतपण मोफत केले जाते. याशिवाय औषधे, रक्त, लघवी व सोनोग्राफीसारख्या तपासण्या तसेच रक्त पुरवठा सर्व काही मोफत देण्यात येते.
- घरापासून दवाखान्यापर्यंत आणि परतीसाठी वाहनाची मोफत व्यवस्था करण्यात येते.
- सामान्य बाळंतपण झाल्यास ३ दिवस तर शस्त्रक्रियेद्वारे झाल्यास ७ दिवस मातेला मोफत आहारदेखील दिला जातो.

### बाळासाठी सेवा

- ३० दिवसांपर्यंत नवजात बालक आजारी असेल तर त्यावर देखील मोफत उपचार केले जातात. बाळासाठी आवश्यक औषधे, तपासण्या तसेच रक्तपुरवठा मोफत केला जातो.
- उपचारानंतर घरी जाण्यासाठी वाहन व्यवस्था मोफत करण्यात येते. (वरील सर्व सेवा आरोग्य संस्थेच्या दर्जानुसार जेथे या सुविधा उपलब्ध आहेत. तेथे दिल्या जातात.)

## कायद्याने लिंग निवडीस बंदी

**कायदा:-** राष्ट्रीय लोकसंख्या धोरणाचा (२०००) मुख्य उद्देश लोकसंख्या नियंत्रण आहे. या मागे सर्वांगीण विकास करून स्त्री–पुरुष प्रमाण समतोल करणे हा देखील एक उद्देश आहे.

त्याच अनुषंगाने प्रसवपूर्व निदान तंत्र (विनिमय आणि दुरुपयोग प्रतिबंध कायद्यात २००२ मध्ये दुरुस्ती होऊन हा कायदा १४ फेब्रुवारी २००३ पासून अस्तित्वात आला. प्रसवपूर्व निदान तंत्र (विनिमय आणि दुरुपयोग प्रतिबंधी १९९४ च्या कायद्याने नावात बदल होऊन गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा असे नाव देण्यात आले आहे.



- या कायद्यानुसार गर्भधारणेपूर्वी किंवा गर्भधारणे नंतर लिंग निवडीस प्रतिबंध आहे. जनुकीय विकृती व गर्भातील इतर गुणसूत्रे संबधित दोष यांचे निदान करण्यासाठी अल्ट्रासाऊंड व तत्सम तंत्राचा वापर करण्यास व कायद्यात परवानगी असली तरी या कायद्यामध्ये गर्भलिंग तंत्रावर नियंत्रण आहे.
- गर्भलिंग निदान तंत्राचा दुरपयोग होऊन, गर्भलिंग निदान करून मुलीचा गर्भ असल्यास तो नाहीसा केला जातो. या प्रकाराला आळा बसावा व त्या द्वारे समाजातील स्त्री–पुरुष प्रमाणातील असमतोल दूर व्हावा व त्या द्वारे समाजातील स्त्री–पुरुष प्रमाणातील असमतोल दूर व्हावा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.
- लिंग निवड करणाऱ्यास रुपये १००००/- (दहा हजार) दंड व ३ वर्षे कारावासाच्या शिक्षेची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे. पुनरावृत्ती झाल्यास रुपये ५००००/- (पन्नास हजार) दंड व ५ वर्षे कारावास अशी शिक्षा होऊ शकते. लिंग निदानात वैद्यकीय डॉक्टरची नोंदणी स्थगित करू शकते आणि डॉक्टरास शिक्षा झाल्यास डॉक्टरांची नोंदणी स्थगित करू शकते आणि डॉक्टरास शिक्षा झाल्यास डॉक्टराची नोंदणी कौन्सिल रद्द करू शकते.

## शासनाचा मदत दूरध्वनी क्रमांक १८००-२३३-४४७५

ची मदत घेता येते किंवा समुचित प्राधिकारी यांच्याकडे तक्रार नोंदविता येते. सोनोग्राफी करणारे डॉक्टर तसेच गरोदर मातेने सोनोग्राफी करण्यासाठी जबरदस्ती करणाऱ्या व्यक्ती या दोघांनाही कडक शिक्षा होऊ शकते.

**www.aamchimulgi.com यावर तक्रार नोंदविता येते.**

**डॉक्टरांशी सुसंवाद:-** आय.एम.ए. स्त्रीरोगतज्ञ, रेडिऑलॉजिस्ट, सोनॉलॉजिस्ट यांच्याशी समन्वय साधावा व कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी त्यांचा सहभाग घ्यावा.

